रजिस्टर्ड नं. एनबीपी-४

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

नं. ३०] गुरुवार, दिनांक २९ ऑगस्ट १९९१ / भाद्रपद ७, शके १९१३

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग ४-अ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांच्यातिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका दरो, जिल्हा नगरपालिका, शासकीय शिक्षण व स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १—अ (ना.वि.पु.) म.शा.रा., अ. क्र. ८९

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. D. P. Gadchiroli-TPV-II-5084.—

Whereas, Gadchiroli Municipal Council (hereinafter referred to as the "said Municipal Council") by its Administrator's order, dated 16th December 1985 made declaration under section 23 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "The said Act") of its intention to prepare a Development Plan for the entire area within its jurisdiction which appeared in the Maharashtra Government Gazette, Part I Supplement, Nagpur Division, dated 20th February 1980 on page 8 ;

And whereas, the said Municipal Council, after carrying out survey of the entire area within its jurisdiction, prepared and published a Draft Development Plan of Gadchiroli (hereinafter referred to as the "said Development Plan") on 17th September 1986 and published a notice to that effect in Maharashtra Government Gazette, Part I-A Supplement, Nagpur Division, dated 30th April 1987 on page 55 in accordance with the provisions of sub-section (1) of section 26 of the said Act ;

And whereas, the said Municipal Council, after considering the suggestions and objections received by it from the members of the public, modified the said Development Plan in accordance with the provisions of section 28 of the said Act, submitted the said Development Plan as modified by it to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, for sanction under sub-section (1) of section 30 of the said Act, on 30th March 1988 ;

And whereas, in accordance with the provisions of sub-section (1) of section 31 of the said Act, the said Development Plan is required to be sanctioned not later than one year from the date of receipt of such plan from planning authority or within such further period as the State Government may decide ;

And whereas, the Government of Maharashtra under Government in Urban Development Department Notification No. TPV-1086-3791-CR-103-1-87-UD-17, dated 5th January, 1987 has delegated to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune the powers exercisable by it under the provisions of section 31 of the said Act, in respect of Development Plans of 'B' and 'C' Class Municipal Councils and for Development Plans undertaken by Zilla Parishads ;

And whereas, Gadchiroli Municipal Council is 'C' Class Municipal Council;

And whereas, the period for sanctioning the said Development Plan under section 31 (1) has been extended by Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Notification No. D. P. Gadchiroli-TPV-2, 3951, dated 10th June, 1991 upto and inclusive of 30th September 1991 ;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune after examining the proposals of the said Development Plan proposes to sanction the said Development Plan subject to certain modifications which are of minor nature and as specified in the Schedule of Modifications appended to this Notification;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 31 of the said Act and all other powers enabling it in this behalf, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby :—

(a) Sanctions the said Development Plan subject to modifications as specified in the "Schedule of Modifications" appended to this Notification.

(b) Fixes the 1st November 1991 to be the date on which the Final Development Plan of Gadchiroli shall come into force.

NOTE.—The aforesaid Final Development Plan as sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune shall be kept open for a period of one year in the office of the Gadchiroli Municipal Council, Gadchiroli on all working days during office hours.

*Development Plan of Gadchiroli*

**Schedule of Modifications**

(1) Designation of Site No. 24 is changed from "Public Purpose" to "Garden" as shown in orange on the Development Plan.

(2) Congested Area Boundary has been specifically shown in Orange verge on the Development Plan.

G. L. MADAME,
Director of Town Planning
(M. S.), Pune.

Pune :
The 20th July 1991.

---

भाग १-अ (ना.वि.पु.) म.शा.रा., अ. क्र. ९०

## संचालक, नगर रचना, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६

क्रमांक वियो-गडचिरोली-टीपीव्ही-२-५०८४.—
ज्याअर्थी, गडचिरोली नगरपरिषदेने (यापुढे 'उक्त नगरपरिषद" असे उल्लेखिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) चे कलम २३ (१) नुसार दिनांक १६ डिसेंबर १९८५ रोजीच्या प्रशासकांच्या आदेशाद्वारे गडचिरोली नगरपरिषदेच्या संपूर्ण हद्दीकरिता विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करून त्याचे प्रसिद्धीकरण दिनांक २० फेब्रुवारी १९८६ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग १ पुरवणी, नागपूर विभागामध्ये पृष्ठ ८ वर केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नगरपरिषदेने तिच्या संपूर्ण हद्दीतील क्षेत्राचे सर्वेक्षण केल्यानंतर विकास योजना गडचिरोलीचा प्रारुप आराखडा (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेला) तयार करून उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) नुसार दिनांक १७ सप्टेंबर, १९८६ रोजी प्रकाशित करून त्यासंबंधीची सूचना दिनांक ३० एप्रिल १९८७ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात, भाग १-अ पुरवणी, नागपूर विभागामध्ये पृष्ठ ५५ वर प्रसिद्ध केली. ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगरपरिषदेने उक्त प्रारुप, विकास योजनेसंबंधी विहित मुदतीत आलेल्या सूचना/हरकतींचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८ नुसार उक्त प्रारुप विकास योजनेत काही किरकोळ स्वरुपाचे फेरफार केलेत व अशी प्रारुप सुधारित विकास योजना संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त अधिनियमाच्या कलम ३० (१) अन्वये मंजुरी मिळण्यासाठी दिनांक ३० मार्च १९८८ रोजी सादर केली ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१, उप-कलम (१) मधील तरतुदीनुसार उक्त विकास योजना नियोजन प्राधिकरणाकडून प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या कालावधीत किंवा शासन ठरविल त्या पुढील कालावधीत मंजूर करावयाची असते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग निर्णय, क्रमांक टीपीव्ही-१०८६-३७९१-सीआर-१०३-१-८७-युडी-१७, दिनांक ५ जानेवारी १९८७ अन्वये "ब" आणि "क" वर्ग नगरपरिषदा तसेच बिगर नगरपरिषद, शहरांच्या विकास योजनांना उक्त अधिनियमाच्या कलमे ३१ नुसार मंजुरी देण्याबाबतचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत;

आणि ज्याअर्थी, गडचिरोली नगरपरिषद "क" वर्ग नगरपरिषद आहे. ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेला अंतिम मंजुरी देण्याचा कालावधी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्रमांक वियो-गडचिरोली-टीपीव्ही-२-३९५१, दिनांक १० जून १९९१ द्वारे दिनांक ३० सप्टेंबर १९९१ पर्यंत वाढविला आहे. ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील प्रस्तावांची छाननी करून सोबतच्या किरकोळ फेरफारांच्या अनुसूचिमध्ये नमूद केल्याप्रमाणे काही किरकोळ स्वरुपाचे फेरफारांसह उक्त विकास योजनेला मंजुरी देण्याचे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रस्तावित्ले आहे ;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ (१) नुसार प्रदत्त असलेल्या शासनाच्या अधिकारांचा वापर करुन संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे या अधिसूचनेद्वारे :—

(अ) उक्त विकास योजनेला या अधिसूचनेसोबतच्या फेरफारांच्या अनुसूचित नमूद केलेल्या फेरफारांसह मंजुरी देत आहेत;

(ब) दिनांक १ नोव्हेंबर १९९१ या दिनांकापासून अंतिम विकास योजना गडचिरोली अंमलात येईल असे निश्चित करीत आहेत.

टीप.—वरीलप्रमाणे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मंजूर केलेली विकास योजना, गडचिरोली नगरपरिषद कार्यालयात कामकाजांच्या दिवशी कार्यालयीन वेळेत एक वर्षाच्या कालावधीसाठी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात येईल.

### फेरफारांची अनुसूची

(१) विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. २४ चे नामाभिधान "सार्वजनिक प्रयोजनार्थ" ऐवजी "बगीचा" असे बदलण्यात येत आहे.

(२) विकास योजना नकाशावर दाट लोकवस्तीच्या क्षेत्रांची हद्द नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविण्यात आली आहे.

गुणवंत मडामे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक २० जुलै, १९९१.

शासकीय मुद्रणालय, नागपूर, येथे मुद्रित.